**प्रेसनोट दिनांक ०४/०८/२०१९**
**विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर**
**विमानतळ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ८७/२०१८ भा.दं.वि.कलम ४२०,४६७,४६८,४६९,४७१,३४ मधील पाहीजे आरोपींना विमानतळ पोलीसांनी अटक करुन उत्कृष्ठ कामगिरी केलेबाबत......**

दिनांक २१/०३/२०१८ रोजी इसम नामे महेश मनोहर शहा वय ४३ वर्षे रा. ५०१,बी-३, शिवरंजन टॉवर्स सोमेश्वरवाडी पाषाण पुणे यांनी विमानतळ पोलीस स्टेशन पुणे येथे हजर राहुन फिर्यादी दिलेत मजकुर की,आरोपी नामे १.पारस सुधिर शहर रा. जयश्री अपार्टमेंट सावित्रीनगर हिंगणेखुर्द सिहगड रोड पुणे, २. सुधिर वालचंद शहा रा. सदर,यांनी सर्व्हे नं.२६९, हिस्सा नंबर १, सिटी सर्व्हे नंबर ४४६६ चिंचवड पुणे येथील रो हाऊस या मिळकतीचे मालक विजय पांडुरंग नवाथे व गिरीष ललितकुमार लुनावत यांचे जागी दुसरे लोक उभे करुन त्यांच्या खोटया सहया करुन स्वतःचे नावे बोगस खरेदीखत करुन ते सह निबंधक कार्यालयमध्ये रजिस्टर करुन घेवुन ते फिर्यादीचे इंडोस्टार कॅपीटल फायनान्स लिमी.कंपनीचे कर्ज प्रकरणामध्ये देवुन १,४०,५०,०००/-रुपये कर्ज घेवुन आमचे कंपनीची फसवणुक केलेली आहे. वगैरे मजकुराची तक्रार दिल्याने विमानतळ पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि नंबर ८७/२०१८ भा.दं.वि.कलम ४२०,४६७,४६८,४६९,४७१,३४ प्रमाणे दाखल करण्यात आलेला होता.

दाखल गुन्हयाचे तपास अंमलदार श्री एम आर खोकले सहा पोलीस निरीक्षक,विमानतळ पोलीस स्टेशन पुणे यांनी आरोपी नामे १. .पारस सुधिर शहर रा. जयश्री अपार्टमेंट सावित्रीनगर हिंगणेखुर्द सिहगड रोड पुणे, यास दिनांक २१/३/२०१८ रोजी अटक करुन त्याचेकडे गुन्हयाचा तपास केला असता त्याने गुन्हयातील त्याचे सहकारी आरोपींचे ठावठिकाणां बाबतची माहीती दिलेली नसल्याने गुन्हयातील पाहीजे आरोपींचा तपास चालु होता.

दाखल गुन्हयाचे तपासी अंमलदार श्री एम.आर खोकले व पोलीस हवा. अविनाश शेवाळे यांनी गुन्हयातील पाहीजे असलेल्या आरोपींची माहीती घेवुन दिनांक १/०८/२०१९ रोजी पिंपरी चिंचवड येथे जावुन आरोपी नामे १.हेमंत प्रभाकर गाडगिळ वय ४० वर्षे रा. श्रीकृष्ण बिल्डींग शास्त्रीनगर कासारवाडी, पिंपरी चिंचवड पुणे, २.प्रल्हाद प्रकाश चार्य वय ४५ वर्षे रा. ऊकार चौक, फुगेवाडी पुणे, ३. भास्कर पंजाबराव कळसकर वय ५५ वर्षे रा. साठे कॉलनी, मटके निवास चिंचवड नगर वाल्हेकरवाडी पुणे. यांना ताब्यात घेवुन त्यांना विमानतळ पोलीस स्टेशन पुणे येथे आणुन त्यांचेकडे गुन्हयाचा तपास केला असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिल्याने त्यांना दिनांक ०१/०८/२०१९ रोजी २१/१५ वाजता अटक करुन उत्कृष्ठ कामगिरी केलेली आहे. दाखल गुन्हयाचा तपास एम. आर. खोकले सहा. पोलीस निरीक्षक विमानतळ पोलीस स्टेशन पुणे हे करीत आहेत.

**(राजेंद्र पाटील)**
**वरिष्ठ पोलीस निरीक्षक,**
**विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर**